www.lokrakshanay.com
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

●LOKRAKSHANAY ●RNI.REG.NO. MAHBIL/2023/86118

●Executive editor- Aniket Ghanshyam Bhankal ●Daily ●Thane ●Volume-01, Issue-230 ● Sunday, 28 January 2024 ●Pages-04 ●Rs.2/-

# आरक्षण मिळेपर्यंत मराठा समाजाला ओबीसींचे अधिकार आणि सर्व सवलती - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## ''हा ऐतिहासिक क्षण, मी शिवरायांची शपथ घेतली होती'' मुख्यमंत्र्यांचं उत्साही भाषण



■मुंबई। यश सावंत,

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याला अखेर यश मिळालं आहे. मध्यरात्री झालेल्या चर्चेनंतर मनोज जरांगेंच्या सर्व मागण्यांचा सुधारित अध्यादेश राज्य सरकारने जारी केला आहे. त्यामुळे मागण्या मान्य झाल्याने मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उपोषण मागे घेतलं आहे. यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी आरक्षण मिळेपर्यंत मराठा समाजाला ओबीसींचे अधिकार मिळतीलस असे म्हटलं आहे.

'देशाचंच नव्हे, तर जगाचं लक्ष सकल मराठा समाजाच्या आंदोलनाकडं लागलं होतं. आपली एकजूट आपण कायम ठेवली. अतिशय संयमीपणे, शिस्तीनं हे आंदोलन केलं. आंदोलन करताना इतर समाजाला त्रास होऊ दिला नाही. मराठा समाजानं अनेकांना मोठं केलं. मोठी-मोठी पदं मिळवून दिली. मात्र, पदं मिळाली तेव्हा समाजाला न्याय देण्याची संधी त्यांनी घालवली. आपलं सरकार हे तुमचं सरकार आहे. मतासाठी नाही, हितासाठी निर्णय घेतले आहेत. सर्वसामान्यांना न्याय देणारे निर्णय सरकारनं घेतले आहेत. हा ऐतिहासिक दिवस आहे. मी आपल्या प्रेमापोटी या ठिकाणी आलो. आपलं सरकार देणारं आहे, घेणारं नाही. एक सर्वसामान्य माणूस ज्याला कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नाही. त्याच्या मागे लोक उभे राहिले. असं ज्यावेळी होतं, त्यावेळी त्यात एक वेगळेपण असतं,' असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

आरक्षण मिळेपर्यंत मराठा समाजाला ओबीसींचे अधिकार आणि ओबीसींच्या सर्व सवलती दिल्या जातील अशी घोषणा एकनाथ शिंदे यांनी केली. आज धर्मवीर आनंद दिघे यांची जयंती आहे. बाळासाहेबांची जयंती नुकतीच झाली. या दोघांचे आशीर्वाद आणि सकल मराठा समाजाच्या शुभेच्छा माझ्या पाठीशी आहेत. आरक्षण मिळेपर्यंत मराठा समाजाला ओबीसींच्या सवलती व अधिकार दिले जातील. आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना वाऱ्यावर सोडणार नाही. त्यांना आर्थिक मदत दिली आहेच, पण नोकऱ्याही दिल्या जाणार आहेत. सरकार पूर्ण गंभीर आहे. मंत्रिमंडळाशी चर्चा करून हा निर्णय घेतला आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

एक मराठा लाख मराठा आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. तुम्ही मराठ्यांनी संयमीपणे या ठिकाणी आंदोलन केलं. राज्य सरकारने तुमच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. मराठा समाजासाठी असलेल्या सर्व महामंडळांना न्याय देण्याचं काम राज्य सरकार करेल.

## अनमोल विचार

''कुणालाही जिंकायचं असेल तर प्रेमाने जिंका.''

## लक्षवेधी

### म्हणून नितीश कुमार इंडिया आघाडी सोडतायेत - केंद्रीय मंत्र्याने सांगितलं कारण

**नवी दिल्ली** : बिहारमध्ये पुन्हा एकदा राजकीय भूकंप होण्याचे संकेत मिळत आहेत. नितीश कुमार आपला पक्ष जनता दल युनायटेडसह भाजपसोबत जाण्याच्या तयारीत आहेत. याबाबतच्या हालचाली सध्या बिहारमध्ये वेगाने सुरु आहेत. लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर नितीश कुमार यांच्यासारखा नेता इंडिया आघाडी सोडून आपल्यासोबत येत असल्याने भाजपमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अशातच, नितीश कुमार यांच्या ह्यएनडीएह्णमधील वापसीच्या चर्चांबाबत भाजप नेते व केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी वक्तव्य केलं आहे. इ

### मल्लिकार्जुन खरगेंच्या फोनला नितीश यांचा 'नो रिप्लाय'

**नवी दिल्ली** : बिहारच्या राजकारणात नाट्यमय घडामोडी घडत आहेत. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी त्यांचा पक्ष जनता दल युनायटेड हा राष्ट्रीय जनता दलासोबतच्या महाआघाडीतून बाहेर पडत असल्याचे संकेत दिले आहेत. अलीकडेच माजी मुख्यमंत्री कपुरी ठाकूर यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात बोलताना नितीश यांनी घराणेशाहीवरून टीका केली होती. तेव्हापासून नितीश लालू यादवांच्या राजदपासून दूर जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आले. नितीश पुन्हा एकदा एनडीएचा घटक होणार अशी चर्चा सुरू असताना लालू यादव आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला.

### मुंबईहून लखनौला जाणाऱ्या इंडिगोच्या फ्लाइटमध्ये गोंधळ

**मुंबई** : दिल्यानंतर मुंबई विमानतळावर एका प्रवाशाने बॉम्बची धमकी दिल्याने गोंधळ उडाला. वृत्तानुसार, एका प्रवाशाने लखनौला जाणाऱ्या इंडिगो फ्लाइट मुंबईहून लखनौला जाणाऱ्या फ्लाइटमध्ये प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाने सांगितले की, त्याच्या सीटखाली बॉम्ब आहे. या घटनेची माहिती मिळताच संपूर्ण सुरक्षा यंत्रणा ठप्प झाली. मुंबईहून लखनौला जाणाऱ्या इंडिगोच्या फ्लाइट क्रमांक 6E 5264 मध्ये बसलेल्या एका प्रवाशाने यासंदर्भात एअरलाइन्सच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. फ्लाइटमध्ये बसत असताना प्रवाशाने अचानक आपल्या सीटखाली बॉम्ब असल्याचे सांगितले. या घटनेची माहिती मिळताच त्या विमानाच्या उड्डाणाची वेळ बदलून त्याची कसून चौकशी करण्यात आली.

### ममता बॅनर्जींनी केंद्र सरकारला दिला 7 दिवसांचा अल्टिमेटम, म्हणाल्या...

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) प्रमुख ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारला खुले आव्हान दिले आहे. शुक्रवारी ममता बॅनर्जी यांनी केंद्राला सर्व थकबाकी देण्यासाठी सात दिवसांचा अल्टिमेटम दिला. यावेळी ममता बॅनर्जी म्हणाल्या की, केंद्राने सर्व प्रलंबित निधी दिला नाही तर पक्षाकडून मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्यात येईल. दरम्यान, 75 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राजभवन येथे आयोजित कार्यक्रमादरम्यान ममता बॅनर्जी बोलत होत्या. याप्रकरणी ममता बॅनर्जी यांनी गेल्या महिन्यात 20 डिसेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान त्यांनी प्रलंबित केंद्रीय निधीच्या मुद्द्यावर चर्चा केली होती.

### केरळच्या गर्व्हनर Z+ दर्जाची सुरक्षा

**नवी दिल्ली** : केरळच्या गर्व्हनर लो + दजार्ची सुरक्षा देण्यात आल्याची माहिती केंद्र सरकारने दिली आहे. सीआरपीएफचे Z+ सुरक्षा कवच राज्यपाल आणि केरळ राजभवनाला देण्यात आलं आहे. त्यांना कोल्लम मध्ये काळे झेंडे दाखवल्यानंतर हा प्रकार समोर आला आहे. सीपीआयएमची विद्यार्थी संघटना एसएफआयच्या कार्यकर्त्यांनी त्यांना काळे झेंडे दाखवून निषेध केला. त्यामुळे राज्यपाल इतके संतप्त झाले की, ते तात्काळ गाडीतून उतरले आणि रस्त्याच्या कडेला संपावर बसले. राज्यपालांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानदाराकडून खुर्ची मागितली आणि ते तिथेच बसले.


### लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली, विनोद तावडेंवर 'या' महत्वाच्या राज्याची जबाबदारी

**नवी दिल्ली** : आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजप मैदानात उतरला असल्याचे दिसत आहे. त्याच पार्श्वभूमीवर पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांनी निवडणूक प्रभारींची यादी जाहीर केली. त्यात बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालसह 23 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या निवडणूक प्रभारी आणि सह-निवडणूक प्रभारींची नावे आहेत. भाजप पुन्हा सत्तेत येण्याच्या तयारीत असलेल्या बिहारमध्ये विनोद तावडे यांची लोकसभा निवडणुकीसाठी प्रभारी नियुक्ती करण्यात आली आहे. तर दीपक प्रकाश यांना सहप्रभारी करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे हरियाणासाठी विप्लव कुमार देव यांची प्रभारी आणि सुरेंद्र नागर यांची सहप्रभारी नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार लक्ष्मीकांत वाजपेयी यांना झारखंडचे प्रभारी बनवण्यात आले आहे....

### 'दिल्लीत 'ऑपरेशन लोटस'चा कट रचला जातोय'- मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल

**नवी दिल्ली** : दिल्लीत सत्तेत असलेल्या आम आदमी पक्षाने भाजपवर गंभीर आरोप केला आहे. दिल्लीत 'ऑपरेशन लोटस'चा कट रचला जातोय' असा गंभीर आरोप आपकडून करण्यात आला आहे. भाजपने आपमधील सात आमदारांशी संपर्क साधला असून मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अबकारी धोरण प्रकरणात अटक केली जाऊ शकते अशी अफवा पसरवल्याचा दावा आपकडून करण्यात आला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सोशल मीडियावर एक मोठी पोस्ट करत भाजपवर हल्ला चढवला आणि दावा केला की भाजप दिल्लीतील आप आमदारांना फोडण्याचा प्रयत्न करत आहे. अलीकडेच भाजपने आमच्या दिल्लीतील 7 आमदारांशी संपर्क साधला आणि काही दिवसांनी केजरीवाल यांना अटक करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आमदार फोडू, 21 आमदारांशी चर्चा झाली आहे. उर्वरित आमदारांशीही आम्ही बोलत आहोत. असे भाजपने म्हटले असल्याचे मुख्यमंत्र्यानी म्हटले आहे. सरकार पाडण्याचे षडयंत्र रचले जात आहे निवडणुकीत आपचा पराभव करणे त्यांच्या अखत्यारीत नाही, अन्यथा त्यांना बनावट दारू घोटाळ्याच्या निमित्ताने अटक करून सरकार पाडायचे आहे असे म्हटले आहे.

## उल्हासनगर मनसेचे मराठी पाट्यासाठी आंदोलन; २६ जणांना अटक आणि सुटका



■उल्हासनगर। नितीन देवळेकर,

शहरातील दुकानदारांनी ठळक अक्षरात मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदारां विरोधात मनसेने आंदोलन केले. पोलिसांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांना अटक करून सुटका केली. उल्हासनगर महापालिकेने मराठी पाट्या ठळक अक्षरात लावण्यासाठी दुकांदारासह इतर आस्थापनाना नोटिसा दिल्या होत्या. त्यानंतर गुरवारी महापालिका अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दंडात्मक कारवाई सुरू केल्याने, दुकानदारात एकच खळबळ उडाली. शनिवारी मनसे जिल्हाध्यक्ष बंडू देशमुख, शहरप्रमुख संजय घुगे यांच्या नेतृत्वाखाली मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदारा विरोधात छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन केले. यावेळी मनसे पदाधिकारी मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदारांवरील इंग्रजी पाटीला काळे फासून तोडफोड केली जाणार होती. पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्यावर, त्यांनी शिवाजी चौकात आंदोलन करणाऱ्या मनसेच्या २६ पदाधिकाऱ्यांना अटक करून नंतर सोडून देण्यात आले.

## सिंधुदुर्गातील देवमळ्यात अनोखी देवशेती; ग्रामदैवताचं कौल घेऊनचं नांगरणी, रोप लावणीच्या वेळी शेताला जत्रेचं रूप



■सिंधुदुर्ग। सचिन कदम,

सिंधुदुर्गात अनेक रूढी, प्रथा, परंपरा पहायला मिळतात. अनादी काळापासून चालत आलेल्या प्रथा आजही परंपरा जपल्या जातात. अशीच एक अनोखी प्रथा मालवण तालुक्यातील वायंगणी येथे पहायला मिळते. देवाच्या आज्ञेने शेकडो एकर शेती सामुदायिक रित्या केली जाते. फार पूर्वीपासून चालत आलेली ही परंपरा आजही त्याचं उत्साहात जतन केली जाते.

मिळालेल्या माहितीनुसार, मालवण तालुक्यातील वायंगणी गावातील सुमारे तीनशे पन्नास एकर क्षेत्रात पसरलेल्या या देवमळ्यातील ही देवशेती अन्यत्र कुठेही पाहता येणे शक्य नाही. पारंपारिक पद्धतीची शेती ४०० वर्षाची परंपरा असलेली सिंचन व्यवस्था, गावाचा एकोपा, एकसूत्रीपणा, सहकार, ग्रामदेवतेवरील श्रद्धा हे सर्व एकाच ठिकाणी या गावात देवाच्या मळ्यामध्ये अनुभवता येते. एकीकडे कोकणात दिवसेंदिवस पडीक शेत जमिनीचे प्रमाण वाढत असताना दुसरीकडे याच कोकणातील वायंगणीसारखे गाव पिढ्यांपिढ्या शेतीसाठी एकत्र येतात.

या गावातील ही ऐतिहासिक परंपरा खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. शेकडो हातांची लगबग ही दृश्ये आणखी कुठेही पहायला मिळत नाही. वर्षातून एकदा या देवमळ्यात बळीराजाची ही अनोखी जत्रा चालते. या देवमळ्यात घेतलेल्या उत्पादनातून वर्षभर धान्य पुरलं जातं. असं इथले शेतकरी सांगतात.

## न्यायासाठी पूर्ण कुटुंबानं वकिली शिक्षण घेतलं; अन्यायाविरोधात लढण्याचं बळ मिळालं



■मीरा भाईंदर। विशाल पाटील

लोकशाहीतील भारतीय संविधानाचा उत्सव. या संविधानानेच आपल्याला अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ दिले आहे. आज आपण अशाच एका कुटुंबाची कहाणी सांगणार आहोत ज्यांना या संविधानामुळे अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य मिळाले.

मीरा रोड येथील डॉ. खुर्शीद शेख (५४), डॉ. सबिना शेख (४६) आणि त्यांची मुलगी आयेशा (१८) यांची ही कहाणी आहे. हे तिघेही फौजदारी खटल्यात न्याय मिळवण्यासाठी कायद्याचा अभ्यास करत आहेत.

सबिना शेख यांच्या वडिलांनी ८० च्या दशकात भायखळ्यात तिच्यासाठी एक मालमत्ता खरेदी केली होती. मात्र सबिनाच्या भावांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे ती मालमत्ता हडप केली. भावांशी बोलूनही तोडगा निघाला नाही, तेव्हा त्यांनी २०१७ मध्ये पोलिस ठाण्यात तक्रार केली. जवळपास वर्षभर पोलिसांनी कोणताही एफआयआर नोंदवला नाही, त्यानंतर त्यांनी न्यायालयात धाव घेतली. २०१९ मध्ये न्यायालयाच्या आदेशानंतर एफआयआर नोंदवण्यात आला असे असतानाही वकील आणि पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे तपास पुढे सरकला नाही. २०२३ पर्यंत शेख कुटुंबीयांनी ५ वकील बदलले होते आणि सुमारे ५ लाख रुपये खर्च केले होते. न्यायाचा हा लढा सुरू ठेवण्यासाठी अखेर संपूर्ण कुटुंबाने एलएलबी करण्याचा निर्णय घेतला आहे.

डॉ.खुर्शीद शेख यांच्या दोन्ही किडन्या खराब आहेत. त्यांचे आठवड्यातून तीन दिवस डायलिसिस केले जाते.

## नव्या वर्षात मुंबईत आकारास येणार महत्वाचे प्रकल्प

■मुंबई। विशाल कारंडे,



नव्या वर्षात कोस्टल रोडची एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली होत असताना आणखी अनेक महत्वाच्या प्रकल्पांची वीट रचली जाणार आहे. त्यामुळे मुंबईच्य विविध भागातील दळणवळण अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

रस्ते काँक्रीटीकरण आणि जलशुद्धीकरण प्रकल्प नव्या वर्षात आकारास येतील. पालिका रुग्णालयात 'झिरो प्रिस्क्रिप्शन ' संकल्पना प्रत्यक्षात उतरेल... या वर्षात मुंबईत पायाभूत आणि मूलभूत सुविधांच्या बाबतीत महत्वाच्या घडामोडी अपेक्षित आहेत. प्रजासत्ताक दिनी मुंबई महापालिकेच्या प्रभारी आयुक्त अश्विनी जोशी यांनी भविष्यातील मुंबईचे चित्र उभे केले. आयुक्त इकबाल सिंह यांच्या अनुपस्थितीत जोशी यांच्या हस्ते प्रजसत्ताक दिनी पालिका मुख्यलयात ध्वजारोहण करण्यात आले.

त्यावेळी त्यांनी विविध प्रकल्पांची माहिती मुंबईकरांना दिली. कोस्टल रोडची एक मार्गिका या वर्षात कार्यान्वित होईल. उत्तर मुंबईपर्यंत वाहतूक वेगवान व्हावी म्हणून वसोर्वा ते दहिसर किनारी रस्ता आणि त्यापुढे दहिसर ते मिरा-भाइंदर उन्नत मार्ग, गोरेगाव-मुलूंड हे प्रकल्प देखील नियोजित आहेत. मुंबईतील सर्व रस्ते खड्डेमुक्त असावेत, यासाठी रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण व्यापक स्तरावर सुरु केले आहे. वेगवेगळ्या पुलांची कामे प्रगतिपथावर आहेत. भविष्याचा विचार करता, पिण्याच्या पाण्याची वाढती मागणी व पुरवठ्यातील तफावत कमी करण्यासाठी जलबोगद्यांची कामे प्रगतिपथावर आहेत. भांडूप संकुल येथे २,००० दशलक्ष लीटर क्षमतेचा नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प बांधण्याचे नियोजन आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

## 'कोर्टात सर्वकाही स्पष्ट होईल, तोपर्यंत जरांगेंनी प्रकृतीची काळजी घ्यावी'; गुणरत्न सदावर्ते यांचं विधान

■मुंबई। दिगंबर जाधव,



राज्यातील मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला मोठे यश मिळाले आहे. राज्य सरकारकडून मनोज जरांगे यांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार सरकारकडून नवा अध्यादेश तयार करून जरांगे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

जरांगे यांच्या लढ्याला यश मिळाल्यानंतर आता याबाबत सर्वच स्तरातून प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे. खुल्या वर्गातील गुणवंताच्या जागा टिकवणं ही माज्यावर जबाबदारी असल्याचे मत वकील गुणरत्न सदावर्ते यांनी व्यक्त केलं आहे.

जरांगे यांनी केलेल्या मागण्या मान्य केल्यानंतर मराठा बांधवांनी एकच जल्लोष करायला सुरुवात केली. सरकाराने जारी केलेल्या अध्यादेशावर वकील गुणरत्न सदावर्ते यांनी भाष्य केलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाची संरक्षणाची जबाबदारी जयश्री पाटील आणि माझी आहे असं सदावर्ते माध्यमांशी बोलताना म्हणाले.

मराठ्यांना कुणबीप्रमाणपत्रावर ओबीसीतून आरक्षण मिळण्यासाठी अडचणीचे ठरत असलेल्या सगे सोयरे संबंधीचे परिपत्रक सरकारने रात्री उशीरा काढले आहे. त्यानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण आणि आंदोलन मागे घेण्याची घोषणा केली आहे. यावर देखील गुणरत्न सदावर्ते यांनी टीका केली आहे.

## मराठा आरक्षणावर राज ठाकरेंनी सांगितली 'खरी परिस्थिती' जरागेंचं अभिनंदन करत म्हणतात 'लोकसभा निवडणुकीआधी...'



■मुंबई। भावना जैन,

मराठा आरक्षणासाठी लढणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. स्वतः जरांगे यांनी यासंदर्भातील घोषणा करुन आंदोलन मागं घेतल्याचं जाहीर केलं. रात्री निर्णय झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी आज सकाळी ज्यूस पाजून जरांगेंचं उपोषण सोडलं.

मराठ्यांच्या मागण्या पूर्ण झाल्यानंतर राज्यात जल्लोषाचं वातावरण आहे. अशातच आता राजकीय वतुर्ळातून प्रतिक्रिया येण्यास सुरूवात झालीये. अशातच मनसे अध्यक्ष राज ठाकरयांनी या प्रकरणावर ट्विट करत प्रतिक्रिया दिलीये.

**राज ठाकरे काय म्हणाले?**

मनोज जरांगे पाटील यांचं अभिनंदन... सरकारने तुमच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या. आता फक्त आरक्षण मिळायचं बाकी आहे. ते कधी मिळणार हे पण एकदा मुख्यमंत्र्यांना विचारा, म्हणजे आपल्या मराठा बांधवांना भगिनींना ही खरी परिस्थिती समजेल, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीआधी पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा देखील राज ठाकरे यांनी व्यक्त केली आहे.

## सोमनाथ मंदिर परिसरातील अतिक्रमणे पाडली ! महसूल अधिकाऱ्यांसह मोठा फौजफाटा होता उपस्थित

■नवी दिल्ली। प्रगती शर्मा



गुजरातमधील गिर सोमनाथ जिल्ह्यातील सोमनाथ मंदिराच्या परिसरातील सुमारे 3 हेक्टर जागेवरील अतिक्रमणे राज्य सरकारने आज जमीनदोस्त केली. ही जमीन मंदिर ट्रस्ट आणि राज्य सरकारच्या मालकीची आहे असे अधिकाऱ्यांनी सांगितले.त्या भागात २१ पक्की घरे आणि १५३ झोपड्या होत्या, ती सर्व पाडण्यात आली. पाच मामलतदार आणि सुमारे 100 महसूल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली. त्यासाठी तेथे मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सोमनाथ मंदिर अरबी समुद्राच्या किनाऱ्यालगत वेरावळ शहराजवळ प्रभास पाटण येथे आहे. हे भगवान शिवाच्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी पहिले मंदिर असल्याचे मानले जाते आणि हे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळ आहे. सोमनाथ मंदिर आणि राज्य सरकारचे व्यवस्थापन करणाऱ्या श्री सोमनाथ ट्रस्टच्या मालकीची जमीन रिकामी करण्यासाठी 21 अनधिकृत घरे आणि 153 झोपड्या पाडल्या जात आहेत अशी माहिती जिल्हाधिकारी हरजी वाधवानिया यांनी दिली. वाधवानिया म्हणाले की तीन हेक्टर (7.4 एकर) जमीन अतिक्रमणमुक्त केली जाईल आणि राज्य महसूल विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार कुंपण केले जाईल.

## आंदोलनात घर जाळणे, हल्ला करणे, सरकारी मालमत्तेचे नुकसान करण्यासंदर्भातील गुन्हे मागे घेतले जाणार नाही - देवेंद्र फडणवीस



■नागपूर। विशाल कारंडे,

मराठा आरक्षणासंदर्भात करण्यात आलेल्या आंदोलनात घर जाळणे, थेट हल्ला करणे, सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे या संदर्भातील गुन्हे मागे घेण्यात येणार नाही मात्र, अन्य इतर आंदोलनातील गुन्हे मागे घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

खासदार औद्योगिक महोत्सवाच्या निमित्ताने फडणवीस नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. घर जाळणे किंवा सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे हे गुन्हे मागे घेण्याबाबत न्यायालयीन प्रक्रिया आहे. त्यामुळे सरसकट सर्वच गुन्हे मागे घेण्यात आलेले नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मराठा आरक्षण देण्यासंदर्भात कायदेशीर मार्ग काढावा लागेल, असे आम्ही सांगत होतो, मात्र मला आनंद आहे की मराठा समाजाला आरक्षण देताना सरकारने सकारात्मकता दाखविली आहे. नोंदी नसलेल्या रक्त नात्यातील लोकांना प्रमाणपत्र देण्यात येईल आणि सरकारने हा मार्ग स्वीकारला आहे. यामुळे मराठा समाजाचा प्रश्न सुटणार आहे. ओबीसींवर आम्ही अन्याय होऊ देणार नाही.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

# धुक्यात (नेहमीच) हरवलेली वाट!



नागरिकांना असलेल्या अधिकारांचा साक्षात अनुभव यायचा असेल तर सर्व व्यवस्था, यंत्रणा, प्रशासन यात आमूलाग्र सुधारणा करायला हव्यात. वीस वर्षांपूर्वी जे प्रश्न भेडसावत होते, तेच जर आजही जाणवत असतील, तर निश्चितच काहीतरी चुकते आहे. विमानवाहतुकीतील गोंधळाचा जो फटका नुकताच बसला, त्याने हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. आपण आपल्याकडच्या व्यवस्था, यंत्रणा, सोईसुविधा, प्रशासनाचे स्वरूप या गोष्टींचा चिकित्सक आढावा घेणे आवश्यक आहे. प्रजासत्ताक दिन हे त्याचे एक उचित निमित्त असू शकते. याचे कारण असे की नागरिकांना जे मूलभूत हक्क राज्यघटनेने प्रदान केले आहेत,

त्यांचा साक्षात अनुभव या व्यवस्थात्मक बळकटीतूनच येत असतो. एखादी भव्य-दिव्य, नेत्रदीपक गोष्ट घडवून आणण्याने देशवासीयांमध्ये उत्साहाची, अभिमानाची लाट पसरते. पण तेवढ्याने पुरत नाही. आपल्या दैनंदिन जीवनातील छोट्या-मोठ्या संस्था, यंत्रणा, व्यवस्था सुविहित चालणे, ही बाब जास्त महत्त्वाची असते. अगदी अलीकडचे एक उदाहरण विस्ताराने पाहूया, म्हणजे हा मुद्दा स्पष्ट होईल. वृत्तपत्रांत आणि आता इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांतही काही प्रकारचे मथळे सातत्याने पाहायला मिळतात.

'दिल्ली व सर्व उत्तर भारतात विमानसेवा विस्कळीत!' 'प्रवाशांचे अतोनात हाल', 'विमानतळाच्या बाहेर कडाक्याच्या थंडीत आबालवृद्धांची परीक्षा!' 'प्रवाश्यांच्या रागाला सामोरे जाताना विमान कंपन्यांची तारांबळ' अशा प्रकारचे मथळे नुकतेच पुन्हा झळकले.

दोन नाट्यमय घटना

खरे तर दिल्ली व उत्तर भारतातल्या अनेक राज्यांमध्ये पसरणारे दाट धुके आणि या धुक्यामुळे विमान, रेल्वे व रस्तावाहतूक विस्कळीत होणे किंबहुना कोलमडून जाणे व त्यात सापडलेल्या अनेक नागरिकांचे अतोनात झालेले हाल व संयमाची परीक्षा हे सगळे चित्र २००१मध्येही अशाच रीतीने अनुभवायला मिळत होते. त्यावेळेस अमुक मंत्रिमहोदय, तमुक पक्षाचे नेते विमानतळावर गेले व प्रवाशांची समजूत काढली. यावेळी वेगळे मंत्री व वेगळा पक्ष. तेही विमानतळावर जाऊन प्रवाशांची समजूत काढून आले.

त्यावेळेस 'क्ष' विमानकंपनीने दिरंगाई दाखवली यावेळेस 'क्ष'च्या बरोबरीने 'अ' आणि 'ब' यांनीही तशीच दिरंगाई दाखवली. तपशील वेगळा, मूळ प्रश्न व त्याला मिळणारा प्रतिसाद मात्र फारसा बदलला नाही. धुके त्याहीवेळेस असेच दाट. त्यामुळे न दिसणारे रस्ते व धावपट्ट्याही तशाच. त्यामुळे दृश्यमानता कमी होणे हेही तसेच. म्हणजेच सर्व काही मागच्या पानावरून पुढे.

या क्षेत्रातील व्यक्ती, संस्था, अधिकारी यांचे वागणेही वर्षानुवर्षे त्याच पद्धतीचे. या वर्षीच्या आवृत्तीत भर पडली ती दोन नाट्यमय घटनांची. एका प्रवाशाने संतापून जाऊन विमान कर्मचाऱ्याला हाणामारी केली. दुसऱ्या घटनेत प्रवाशांनी धावपट्टीवर ठिय्या देऊन निषेध म्हणून तेथेच जेवणाचे डबे उघडले.

दिल्ली व संपूर्ण उत्तर भारतात थंडीचे दिवस कधी असतात याचे नव्याने ज्ञान करून घेण्याची आवश्यकता नाही. त्या थंडीच्या दीड दोन महिन्यांमध्ये सर्वसाधारणरीत्या कडक थंडी व घनदाट धुके पडण्याचीही शक्यता असलेले दिवस साधारण १५ डिसेंबर ते १५ जानेवारी या काळात असतात, हे सांगायलाही फार मोठ्या हवामानतज्ज्ञाची गरज नाही.

अशा घनदाट धुक्यात विमाने उतरवण्यात व उड्डाण करण्यात अडचणी येतात व त्यामुळे दोन तास ते बारा तासापर्यंत वेळ लागू शकतो. अशा दिरंगाईमुळे केवळ दिल्लीतच नाही तर सर्व भारतभरचे विमान कंपन्यांचे व अनेक वेळा रेल्वेचेही वेळापत्रक कोलमडते हेही जगजाहीर आहे. हे सर्व माहीत असूनही विमान कंपन्या त्यांच्या वैमानिकांना कमी दृश्यमानतेत (म्हणजे ५० ते १०० मीटर एवढेच पुढचे दिसत असताना) अशा परिस्थितीतही विमान उतरवण्याचे किंवा उड्डाण करण्याचे कौशल्यप्रशिक्षण देऊन तयार का करत नाहीत, हा प्रश्न आहे.

अशा धुक्यामध्ये कार्यरत राहतील, अशा धावपट्ट्या का नाहीत, हा आणखी एक प्रश्न. त्या त्या वेळेस फक्त कोरडी आश्वासने द्यायची, सरकारने ताशेरे ओढल्यासारखे दाखवायचे, दंडाची किरकोळ रक्कम लावायची, मंत्र्यांनी समजूत घालायची आणि प्रवाशांनी केवळ दुसरा पर्याय नसल्यामुळे सर्व सहन करायचे हे महानाट्य आता ठरून गेले आहे.

विमानतळावरचे धुके हे एक प्रातिनिधिक उदाहरण. अशी अनेक उदाहरणे समाजजीवनात दिसतात. खणलेल्या बोअरवेलमध्ये बालकांचा मृत्यू, धरणामध्ये बुडून चार तरुण मृत्युमुखी, अमुक समुद्रकिनारी भरतीच्या वेळेस बुडून १५ नागरिक परागंदा अशा आपत्कालीन घटना वारंवार घडतात.

# 5 HEALTHY BREAKFAST OPTIONS TO BALANCE YOUR HORMONES NATURALLY



Deadlines, daily targets, fast-paced lifestyle have become part and parcel of the modern lifestyle. Staying in the stress zone not only steals peace of mind, but also leads to imbalance of hormones that can disrupt your body processes, lower your efficiency, and make you susceptible to several illnesses. A healthy breakfast can fuel your body for the day ahead, keeping your blood sugar levels balanced and regulating your mood and energy levels. A balanced meal with the right proportions of protein, healthy fat, complex carbs, vitamins and minerals can set you up for the day and help balance your hormones naturally. Sugary and high-calorie food can do the opposite and leave you with low energy or mood swings.

HORMONE-FRIENDLY BREAKFAST CHOICES

Nutritionist Bhakti Arora Kapoor says fuelling your day with a hormone-loving breakfast sets the tone for balanced well-being. Kapoor shares breakfast options that can support your hormones:

1. Protein power: Protein is crucial for muscle health and helps support weight loss by building muscle mass. It also helps keep your energy levels high. Kickstart your morning with protein-rich foods like eggs, Greek yoghurt, or plant-based options. Protein provides amino acids crucial for hormone production.
2. Healthy fats: Avocado, nuts, and seeds are not just delicious, they are hormone heroes. These fats help in the synthesis of hormones, including those essential for mood and energy. They also keep your digestive health robust which also in turn helps you feel better.
3. Colourful carbs: Load up on vibrant fruits and veggies. The antioxidants and fibre support insulin sensitivity, promoting stable blood sugar levels and hormone balance. Complex carbohydrates can do wonders for your overall health.
4. Hydration: Dehydration can disrupt hormone production and affect function of endocrine gland. Start your day with a glass of water to boost your hormonal health. Hydration is key for optimal hormone function and overall health.
5. Mindful eating: Eating your breakfast hurriedly can do more harm than good. Slow down and savour each bite of your breakfast as it sets the tone of your day. Mindful eating reduces stress, a hormone disruptor, and enhances digestion. Keeping these breakfast tips in mind will not only keep you well-energised during the day, but also support hormone balance.

# चांगल्या आरोग्यासाठी तुम्ही देखील जास्त बदाम खात असाल तर होऊ शकतात हे दुष्परिणाम



स्टार आपण सर्वांनी ऐकले असेल की बदाम खाल्ल्याने अनेक आरोग्यदायी फायदे होतात. हे खरे देखील आहे. पण असे असले तरी देखील कोणतीही गोष्ट प्रमाणातच खायला हवी. लहानपणापासून मुलांना बदाम खायला दिले जातात. त्याचे तसे आरोग्यदायी फायदे दखील आहेत. आपल्या मेंदूला तीक्ष्ण ठेवण्यापासून ते हृदय निरोगी ठेवण्यापर्यंत अनेक फायदे होतात. पण याचा अतिरेक तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. त्याचे काही तोटेही आहेत.

**पचन समस्या** – जास्त बदाम खात असाल तर त्याने पचनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात. यातील उच्च फायबरमुळे गॅस आणि पोट फुगणे अशा समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**ऍलर्जी** – तुम्ही जर जास्त बदाम खाल्ले तर त्यामुळेऍलर्जी देखील होऊ शकते. बदामाच्या ऍलर्जीमुळे मळमळ, पुरळ, श्वास घेण्यास त्रास, उच्च रक्तदाब आणि सूज येऊ शकते.

**मुतखडा** – बदामामध्ये ऑक्सलेट आढळते ज्यामुळे ते जर तुम्ही जास्त प्रमाणात खाल्ले तर ऑक्सलेटची पातळी वाढते. ज्यामुळे किडनी स्टोन होऊ शकतो. त्यामुळे बदाम मर्यादित प्रमाणातच खा.

**जास्त प्रमाणात व्हिटॅमिन ई** – जास्त बदाम खाल्ल्याने व्हिटॅमिन ई ची विषबाधा देखील होऊ शकते. ज्यामुळे अतिसार, पोटात पेटके आणि इतर पाचन समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**वजन वाढणे** – जास्त प्रमाणात जर बदाम खात असाल तर याने तुमचे वजन ही वाढू शकते. यात मोठ्या प्रमाणात कॅलरी असतात. ज्याने वजन वाढते.

**पोषक तत्वांची कमतरता** – बदामामध्ये फायटिक नावाचे ऍसिड असते. हे शरीरातील महत्त्वपूर्ण खनिजे आणि पोषक तत्वांचे शोषण करण्यात अडथळा आणू शकते. अशा परिस्थितीत बदाम जास्त प्रमाणात खाल्ल्याने कॅल्शियम, लोह आणि झिंकसारख्या पोषक तत्वांची कमतरता निर्माण होऊ शकते.

बदान कसे खावे - बदाम जर भिजवून खालले तर त्याचा दुप्पट फायदा होऊ शकतो. भिजवून खालले तर त्यामुळे ते पचनाचा सोपे असतात. रात्री पाण्यात भिजवून सकाळी तुम्ही ते खाऊ शकता.

# मराठी अभिनेत्याला थेट राज्यपालांनी बोलावलं! म्हणतो - सरकार दरबारी जेव्हा..



'फत्तेशिकस्त', 'फर्जंद', 'पावनखिंड' अशा ऐतिहासिक सिनेमांमध्ये बहिर्जी नाईक ही भूमिका साकारून घराघरात पोहोचलेला अभिनेता म्हणजे हरीश दुधाडे. मालिका आणि नाटकांमध्ये काम करत हरीशने अभिनयाचा ठसा उमटवला. बहिर्जींबरोबरच हरीशला पोलिसाच्या भूमिकेतही चाहत्यांनी पसंत केलं. 'कारण गुन्ह्याला माफी नाही' ही त्याची मालिका प्रचंड गाजली. या मालिकेत तो विजय भोसले ही पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे. हरीश दुधाडेच्या या भूमिकेला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रेम मिळत आहे. त्याच्या या कामाची दखल राज्यपाल रमेश बैस यांनीही घेतली आहे. प्रजासत्ताक दिनासाठी बैस यांनी हरीश दुधाडेला त्यांच्या निवासस्थानी आमंत्रित केलं होतं. याबाबत त्याने पोस्ट शेअर केली आहे. एक कलाकार म्हणून आम्हाला विविध प्रकारे कामाची पावती मिळत असते पण सरकार दरबारी जेव्हा ती नोंद घेतली जाते तेव्हा तो दिवस अविस्मरणीय ठरतो. माननीय गवर्नर श्री. रमेशजी बैस यांच्या निवासस्थानी मला आमंत्रित केले गेले.

# 'हे फार धाडसाचे काम...', शरद पोंक्षेंच्या 'त्या' निर्णयावर संकर्षण कऱ्हाडेची प्रतिक्रिया



मराठी अभिनेते शरद पोंक्षेंची प्रमुख भूमिका असलेले 'मी नथुराम गोडसे बोलतोय' चांगलंच गाजलं. या नाटकाने 26 जानेवारी 2023 रोजी कायमस्वरुपी प्रेक्षकांचा निरोप घेतला. नथुराम गोडसे या नाटकाचा शेवटचा प्रयोग मुलुंडच्या कालिदास नाट्यगृहात पार पडला. या नाटकाच्या शेवटच्या प्रयोगालाही प्रेक्षकांचा भरभरुन प्रतिसाद मिळाला. आता या नाटकाच्या निमित्ताने अभिनेता संकर्षण कऱ्हाडेने भावूक व्हिडीओ शेअर केला आहे. त्याने यात संपूर्ण टीमचे आभार मानले आहेत.

# 'नाट्यगृह स्वच्छ ठेवणं ही...', प्रेक्षकांनी टाकलेला कचरा पाहून संतापली प्रिया बापट




मराठी इंडस्ट्रीतील 'क्यूट कपल' म्हणजेच प्रिया बापट आणि उमेश कामत. दोघेही मराठी कलाविश्वात प्रचंड लोकप्रिय आहे. प्रिया-उमेशची जोडी ₹जर तर ची गोष्ट₹ या व्यावसायिक नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. नुकताच तिच्या नाटकाचा एक प्रयोग पार पडला. यावेळी नाट्यगृहात प्रेक्षकांनी टाकलेल्या कचऱ्याला पाहून प्रिया संतापली आहे. सोशल मीडियावर फोटो शेअर करत तिनं प्रेक्षकांना सुनावलं. प्रिया बापट सोशल मीडियावर प्रिया बापट बरीच ॲक्टिव्ह असते. प्रियाने इन्स्टाग्रामवर केलेल्या फोटोमध्ये रिकाम्या बाटल्या व कचरा दिसत आहे. यावर प्रियाने या सर्व प्रेक्षकांची कानउघडणी करत तो कचरा कचरापेटीत टाकावं, म्हणत संताप व्यक्त केला आहे. पोस्ट शेअर करत तिनं कॅप्शनमध्ये लिहलं, 'नाट्यगृह स्वच्छ ठेवणे ही प्रेक्षकांचीही जबाबदारी आहे. कचरा कचरापेटीत टाकावा, नाट्यगृहात नाही. ही साधी गोष्ट आपल्याला कधी कळणार?'. प्रिया वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाल्यास, चित्रपट, मालिका, वेबसीरिज आणि नाटक अशा चारही माध्यमांतून प्रिया बापटने आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. अभिनेत्रीने मराठीसह बॉलीवूडमध्येही स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'प्रोडक्शन नंबर ८' या बॉलिवूड सिनेमात तिची वर्णी लागली आहे. सेजल सेठ या चित्रपटाचं दिग्दर्शन करत असून यामध्ये प्रिया अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीबरोबर स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. ९०च्या काळातील गोष्ट या चित्रपटातून दाखविण्यात येणार आहे.

## HEALTH AND SPORTS

### JASPRIT BUMRAH SENDS DUCKETT'S STUMPS CARTWHEELING AFTER BEING DENIED DRS IN CLASSIC REDEMPTION IN IND VS ENG 1ST TEST



**NEW DELHI:** In the unpredictable world of sports, emotions can swing wildly from one extreme to another; Jasprit Bumrah experienced this firsthand during a crucial phase of the first Test against England on Saturday. It all unfolded during the 16th over of England's second innings when Bumrah, bowling with his trademark precision, struck Ben Duckett on the back pad with a delivery that seemed to have lbw written all over it. However, the on-field umpire remained unmoved, turning down India's fervent appeal. Captain Rohit Sharma, after a brief discussion with wicketkeeper KS Bharat, opted against reviewing the decision, believing the ball was drifting down the leg. But fate had other plans. The replay revealed the opposite as the players glanced up at the giant screen during the change of ends. The delivery from Bumrah, which Rohit and Bharat thought to be missing the stumps, would, in fact, have crashed into the leg stump. Shock and frustration gripped Bumrah as he watched the replay, and disbelief was evident in his gestures as he raised both hands in protest. Yet, Bumrah didn't let the setback deter him. With reverse on offer, Rohit opted to continue with Bumrah in the 18th over and finally, redemption arrived in the form of a thunderous roar as Bumrah shattered Duckett's stumps. This time, there was no need for reviews or umpire interventions – Bumrah had produced a moment of brilliance, sending the stump cartwheeling and providing India with a crucial breakthrough in the game.

### SUNIL GAVASKAR COUNTERS KEVIN PIETERSEN IN INTENSE COMMENTARY BOX DEBATE OVER IND VS ENG 1ST TEST PITCH



**NEW DELHI :** Legendary India cricketer Sunil Gavaskar and former England captain Kevin Pietersen had an intense debate in the commentary box over the nature of the pitch at the Rajiv Gandhi Stadium in Hyderabad. The first India vs England Test match has been a great advert of Test cricket so far. Wickets have fallen at regular intervals, the batters ready to play shots have got rewards and the match has moved on at a fast pace. Much of the credit for that must go to the surface. That this pitch is not like the ones England got in Ahmedabad when they toured here in 2021 was evident when Jasprit Bumrah's first three deliveries were collected over the shoulders by India keeper KS Bharat on Day 1. Good carry meant the batters could for their shots and so they did. The England openers Zak Crawley and Ben Duckett scored at nearly five runs an over for the first 10 overs before spin came into the picture. Ravichandran Ashwin got Duckett LBW in his second over. Ravindra Jadeja induced the outside of Ollie Pope's bat and Crawley chipped an Ashwin delivery to mid-off. From 55/0, England were 60/3. At least two deliveries in Jadeja's first over spun past the right-hander's defensive push. That is where Pietersen had a problem. "Look at the way Jadeja's first two deliveries turned. That's Day 1 of a Test match. The ball shouldn't be turning that much," he said in commentary during the last session of Day 2.

### KIRAN GEORGE GOES DOWN TO WORLD CHAMPION VITIDSARN, INDIAN CHALLENGE ENDS



**NEW DELHI :** Indian qualifier Kiran George's dream run ended in the quarterfinals when he lost to reigning world champion Kunlavut Vitidsarn of Thailand in the Indonesia Masters on Friday. The Indian world number 36 went down 14-21 6-21 to the world number 9 in a battle lasting 43 minutes. With this, the Indian challenge also ended in the BWF World Tour Super 500 tournament. World number 19 Lakshya Sen and Priyanshu Rajawat, ranked 30th, had lost their respective pre-quarterfinals on Thursday. World number 7 HS Prannoy, who is the top ranked Indian, had made an opening round exit going down to Kean Yew Loh of Singapore. India's top men's doubles duo Satwiksairaj Rankireddy and Chirag Shetty had pulled out of the Indonesia Masters after reaching back-to-back finals in its last two tournaments. Kiran, who eliminated Chinese Lu Guang Zu from the pre-quarters on Thursday, found himself on the backfoot trailing 0-3 and saw the deficit stretch to 4-8. But he won three points in a row to make it 8-11 at the mid-game break. The Thai shuttler, however, upped his game to win four successive points en route to take the opening game. Vitidsarn was ruthless in the second game reeling off 11 points in a row on both sides of the break that gave him a commanding 18-5 lead. It was then a formality for Vitidsarn to seal a semi-final clash against Anders Antonsen of Denmark. For the 2023 world champion this was incidentally his first win over Kiran at senior level. Kiran had defeated Vitidsarn in Malaysia International Series in 2017.

### FURRY FRUIT IMPROVES MENTAL HEALTH



Kiwifruit has emerged as a potent mood booster, as highlighted by recent research from the University of Otago, showcasing its swift impact on mental health. Published in The British Journal of Nutrition, the study revealed that the fuzzy fruit could enhance vitality and mood in as little as four days. Co-author Professor Tamlin Conner, from the Department of Psychology, emphasises the tangible and accessible way this offers for individuals to support their mental well-being through simple dietary changes. 'It's great for people to know that small changes in their diet, like adding kiwifruit, could make a difference in how they feel every day,' he said. Co-author Professor Tamlin Conner, of the Department of Psychology, says the findings provide a tangible and accessible way for people to support their mental well-being. "It's great for people to know that small changes in their diet, like adding kiwifruit, could make a difference in how they feel every day." Vitamin C intake has long been linked to improved mood, vitality, well-being, and reduced depression. Conversely, vitamin C deficiency is associated with higher depression and cognitive impairment. However, Professor Conner says limited research has explored the speed at which mood improvements occur with vitamin C supplements or whole food sources. In an 8-week dietary intervention involving 155 adults with low vitamin C levels, participants were assigned a daily intake of either a vitamin C supplement, a placebo, or two kiwifruits. Smartphone surveys were used to report vitality, mood, flourishing, sleep quality, quantity, and physical activity. The researchers found that kiwifruit supplementation remarkably improved vitality and mood within just four days, reaching a peak around 14-16 days, while flourishing improved from day 14. Vitamin C, in contrast, showed marginal mood improvement until day 12.

### SUPERFOOD PEAR: KNOW THESE BENEFITS OF NASHPATI



In the realm of nutrition, some fruits stand out not only for their delicious taste but also for their remarkable health benefits. Nashpati, more commonly known as the pear, is one such fruit that has gained recognition as a nutritional powerhouse. Beyond its sweet and juicy flavour, the pear boasts an impressive array of vitamins, minerals, and antioxidants, making it a superfood worthy of closer examination. Here are 5 reasons why you should add Nashpati to your diet. Rich in dietary fibre: One of the standout features of pear is its high dietary fibre content. Fibre is essential for maintaining a healthy digestive system, and pears provide an excellent source. The soluble fibre in pears aids in preventing constipation, promoting regular bowel movements, and supporting a healthy gut. This fibre content also contributes to weight management by promoting a feeling of fullness, thereby reducing overall calorie intake. Loaded with antioxidants: Pears are packed with antioxidants, with vitamin C and copper being prominent contributors. These antioxidants play a crucial role in combating free radicals in the body, which are molecules that can cause cellular damage and lead to inflammation. By reducing oxidative stress, the antioxidants in pears contribute to a strengthened immune system and may help lower the risk of chronic diseases. Heart-healthy properties: Research suggests that nashpati may have heart-protective benefits. The combination of fibre, potassium, and antioxidants in pears can contribute to maintaining healthy blood pressure levels, reducing cholesterol, and promoting overall cardiovascular health. Including pears in a heart-healthy diet may be a simple yet effective way to support cardiac well-being. Natural energy boost: Pears contain natural sugars, including fructose and glucose, providing a quick and healthy energy boost. Unlike processed sugars, the natural sugars in nashpati come with the added benefits of fibre, vitamins, and minerals. This makes pears a smart choice for a natural energy source that not only provides a quick pick-me-up but also sustains energy levels without leading to the crashes associated with refined sugars.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118
Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Adviser: Adv. Aniket Ghanshyam Bhankal, L.L.B., (ठाणे न्याय कक्षेत)

